नियमीत दिवाणी दावा क्र.१३/२०२४

(गजानन विरुध्द मनोहर वगैरे)

## निशाणी क्र.२७ खालील आदेश

## (दिनांक २२.०६.२०२६)

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांनी प्रतिदाव्यास लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याकरिता सादर केला आहे. त्याने असे कथन केले आहे की, मुळ दाव्यातील प्रतिवादी क्र.९ याने प्रतिदावा सादर केला असून सदर प्रतिदाव्यास लेखी म्हणणे सादर करणेकरिता आवश्यक असणारी कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने विहीत मुदतीत प्रतिदाव्यास लेखी कैफियत दाखल करण्यास ७९ दिवसांचा विलंब झाला. सदरचा विलंब माफ हा जाणुनबुजून केला नसल्याने त्याने सदरचा विलंब माफ करुन लेखी कैफियत पटलावर सादर करण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिदाव्यातील वादी यांनी प्रस्तुतचे अर्जास नि.क्र.२९ वर त्यांचे म्हणणे सादर करुन सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ असल्याने, विलंब जाणुनबुजून केला असल्याने सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मुळ दाव्यातील प्रतिवादी क्र.९ याने प्रतिदावा दाखल केला असून प्रतिदाव्यातील प्रतिवादी (मुळ वादी) यास प्रतिदाव्यास लेखी कैफियत दाखल करण्यास विलंब झाला आहे. अर्जामधील नमुद कारणे संयुक्तिक नसले तरीही प्रतिदाव्याचा योग्य त्या गुणदोषांवर निकाल लावणेकरिता प्रतिदाव्यातील प्रतिवादीस पटलावर लेखी कैफियत दाखल करण्याची मुभा देणे नैसर्गिक तत्वाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांचा निशाणी क्र.२७ कडील अर्ज र.रु.५००/– खर्चासह मंजूर करण्यात येत आहे व लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

२. खर्चाची रक्कम प्रतिदाव्यातील वादी यांना देण्यात यावे.

३. दोन्ही पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

SHAIKH MOHAMMED AAMER Digitally signed by SHAIKH MOHAMMED AAMER Date: 2026.06.22 18:12:50 +0530

पलूस. (एम.ए.एम.जे. शेख)

दिनांक– २२.०६.२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर

पलूस.

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.G.A. Patil (Grade-3) |
| Court | : | M.A.M.J. Shaikh, Civil Judge Junior Division & Judicial Magistrate First Class, Palus, Dist. Sangli. |
| Date | : | 22.06.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding officer on | : | 22.06.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 22.06.2026 |